महाराष्ट्र शासन

क्र. अन्नयो २०१५/ प्र.क्र. १२५/ना.पु.-२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ सप्टेंबर, २०१५.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)

२) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (गो/वा),मुंबई.

३) सर्व उप आयुक्त,(पुरवठा)

४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी (सर्व जिल्हे),

५) अन्नधान्य वितरण अधिकारी (पुणे, नागपूर, सोलापूर),

**विषय :-** केंद्रिय अन्नपुर्णा योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मधील माहे एप्रिल,२०१५ ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीकरिता वितरित करावयाच्या अन्नधान्याचे नियमित मासिक नियतन.

**संदर्भ :-** केंद्र शासनाचे पत्र क्र. जे -११०११/१/२०१५-NSAP (अन्नपुर्णा), दिनांक २४ ऑगस्ट, २०१५.

केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये राज्याकरिता माहे एप्रिल, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीकरिता केंद्रिय अन्नपूर्णा योजनेंतर्गत अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर केले आहे. त्याआधारे सर्व जिल्ह्यांकरिता त्या-त्या जिल्ह्यातील लाभार्थ्यांची संख्या विचारात घेवून, जिल्हानिहाय नियतन तयार करण्यात आले असून, ते सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आले आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली यांनी त्यांच्या दिनांक १० मे, २०११ रोजीच्या पत्रान्वये जिल्हयातील अन्नपूर्णा योजनेचे सर्व लाभार्थी श्रावणबाळ योजनेअंतर्गत परावर्तीत करण्यात आल्याने सद्यःस्थितीत गडचिरोली जिल्हयात अन्नपूर्णा योजनेअंतर्गत एकही लाभार्थी शिल्लक नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्हयास नियतन मंजूर करण्यात आलेले नाही.

अन्नपूर्णा लाभार्थी मोजताना जर ते दुबार मोजले गेले असतील उदा. अन्नपूर्णा लाभार्थ्यास जर अंत्योदय अन्न योजनेचे कार्ड दिले असेल तर सदरची चूक दुरूस्त करण्यात यावी व ते धान्य अन्नपूर्णा लाभार्थ्यांनाच मिळेल याची दक्षता घ्यावी.

२. सदर योजनेबाबत खालील मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजालणी करावी.

सदर नियतनाची दरमहा वेळेत व संपूर्ण उचल करावी. या अन्नधान्याची FCI कडे (संबंधित जिल्हा व्यवस्थापक) प्रचलित बीपीएल दराने पैसै भरून उचल करावी व संबंधित पात्र लाभार्थ्यांना

दिनांक ३१ मार्च,२००१ च्या शासन निर्णयातील सूचनांनुसार वाटप करण्यात यावे. हे धान्य नियतन भारतीय अन्न महामंडळाकडून उचलण्यासाठी सुरुवातीस रक्कम पीएलए मधून खर्च करावी. प्रत्येक महिन्यात अशा खर्च झालेल्या रकमेच्या भरपाईसाठी वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांच्याकडे मागणी करावी व अन्नपूर्णा योजनेवर होणारा संपूर्ण हिशोब स्वतंत्र ठेवावा. सर्व जिल्हयांनी अन्नपूर्णा योजनेची धान्य खरेदी वाहतूक, रिबेटस कमिशन इ. सर्व बाबींवर पीएलए मधून केलेल्या खर्चाची माहिती दरमहा नियमितपणे वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांना पाठवून त्याची प्रतिपूर्ती दर तिमाहीस वित्तीय सल्लागारांकडून मिळवून त्या रकमा पीएलए मध्ये भराव्यात. या **विषयी सविस्तर सूचना वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांनी स्वतंत्रपणे द्याव्यात.**

३. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार गहू व तांदूळाची उचल, वाटप आणि एकूण खर्च याची माहिती प्रत्येक महिन्यास शासनास तसेच वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांना पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत सादर करावी. तसेच या नियतनाची उचल व वाटपाबाबतची माहिती दरमहा **"महाफूड आज्ञावली"** मध्ये न चुकता भरली जाईल याची दक्षता घ्यावी.

४. **माहे एप्रिल, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ या महिन्यांकरिता मंजूर केलेल्या नियतनांची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करणे व अन्नधान्याची उचल करणे याकरिता केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये दिनांक ३०.०९.२०१५ पर्यंत मुदत दिली आहे. केंद्र शासनाच्या दिनांक १८ जुलै, २००८ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार अन्नधान्याची उचल करण्याची दक्षता घेण्यात यावी.** या योजनेअंतर्गत प्रति शिधापत्रिका वाटण्यात येणारे १० किलो धान्याचे परिमाण विचारात घेऊन जिल्हानिहाय नियतन सोबतच्या विवरणपत्रात दर्शविले आहे. या नियतनाची उचल भारतीय अन्न महामंडळाकडून बीपीएल अन्नधान्याच्या प्रचलित दराने पैसे भरून करावयाची आहे.

तरी सोबतच्या विवरणपत्रातील मंजूर नियतनानुसार या योजनेच्या अन्नधान्याची उचल तात्काळ सुरू करावी व सदर योजनेअंतर्गत मोफत धान्य वाटपाचा लाभ सर्व लाभार्थ्यांना मिळेल याची खातरजमा करावी.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी

सोबत : विवरणपत्र

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१) वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, जिल्हयाने भारतीय महामंडळाकडून उचल केलेल्या अन्नधान्याचे लेखे सादर करण्यासाठी आवश्यक त्या सविस्तर सूचना आपल्या स्तरावरून स्वतंत्रपणे त्वरेने निर्गमित कराव्यात व त्याची प्रत या कार्यासनास पाठवावी.

२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच नियंत्रक, शिधावाटप यांना विनंती की, त्यांनी सदर आदेशान्वये नियतन विचारात घेऊन अन्नधान्याचे वाटप करावे व वाटपानंतरचा प्रत्येक महिन्यातील अंतिम शिलकीचा अहवाल (progressive report) प्रत्यके महिन्याच्या ५ तारखेस संबंधित विभागाच्या उप आयुक्त (पुरवठा) यांना न चुकता सादर करावा व सर्व उप आयुक्त (पुरवठा) यांनी दरमहिन्याच्या १० तारखेस संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांच्या कार्यालयास सादर करावा व त्या

कार्यालयाने दरमहिन्याच्या १५ तारखेस संपूर्ण राज्याचा एकत्रित अहवाल राज्य शासनास सादर करावा. तसेच वाटप -शिलकीचा progressive मासिक व वार्षिक अहवाल शासनास सादर करावा.

तसेच विनंती करण्यात येते की, सर्व जिल्हयांची या योजनेच्या धान्याच्या उचल व वाटपाबाबतची जिल्हानिहाय माहिती दरमहा संकलित करून पुढील पंधरवडयात उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई व शासनास सादर करावी. तसेच सदर नियतनाचा कालावधी संपल्यानंतर दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ पर्यंत सदर योजनेअंतर्गत उचल, वाटप व शिलकीच्या आकडेवारीसह विहीत प्रपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र शासनास विनाविलंब सादर करावे.

३) उपसंचालक,नागरी पुरवठा पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई

यांना विनंती करण्यात येते की, वरीलप्रमाणे प्राप्त झालेली माहिती तपासून राज्याची एकत्रित माहिती शासनास सादर करावी.

( हेमंत वाडीकर )

कक्ष अधिकारी.

प्रत माहिती साठी सादर.

१) खाजगी सचिव, मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण.)

२) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण.)

पत्र क्र. अन्नयो-2015/प्र.क्र.125/नापु-22, दि. 14 .09.2015 सोबतचे विवरणपत्र.

Monthly Allocation for Annapurna Scheme for the Period from April, 2015 to September, 2015

(M.T.)

| Sr.No. | District | No. of beneficiaries | QUANTUM OF FOODGRAIN (KG) | | | Monthly Allocation (M.T.) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL |
| 1 | MTRA | 10481 | 5 | 5 | 10 | 52 | 52 | 104 |
| 2 | Thane | 2402 | 2 | 8 | 10 | 5 | 19 | 24 |
| 3 | Raigad | 2047 | 2 | 8 | 10 | 4 | 16 | 20 |
| 4 | Ratnagire | 815 | 2 | 8 | 10 | 2 | 7 | 9 |
| 5 | Sindhudurg | 690 | 2 | 8 | 10 | 1 | 6 | 7 |
| 6 | Nasik | 917 | 7 | 3 | 10 | 6 | 3 | 9 |
| 7 | Ahmednagar | 5533 | 7 | 3 | 10 | 39 | 17 | 56 |
| 8 | Jalgaon | 2094 | 7 | 3 | 10 | 15 | 6 | 21 |
| 9 | Dhule | 1745 | 7 | 3 | 10 | 12 | 5 | 17 |
| 10 | Nandurbar | 1319 | 2 | 8 | 10 | 3 | 11 | 14 |
| 11 | Pune(Rural) | 823 | 7 | 3 | 10 | 6 | 2 | 8 |
| 12 | Pune(City) | 235 | 7 | 3 | 10 | 2 | 1 | 3 |
| 13 | Satara | 1984 | 7 | 3 | 10 | 14 | 6 | 20 |
| 14 | Sangli | 1349 | 7 | 3 | 10 | 9 | 4 | 13 |
| 15 | Solapur (Rural) | 1102 | 7 | 3 | 10 | 8 | 3 | 11 |
| 16 | Solapur (City) | 81 | 7 | 3 | 10 | 1 | 0 | 1 |
| 17 | Kolhapur | 372 | 7 | 3 | 10 | 3 | 1 | 4 |
| 18 | Aurangabad | 2422 | 7 | 3 | 10 | 17 | 7 | 24 |
| 19 | Jalna | 2261 | 7 | 3 | 10 | 16 | 7 | 23 |
| 20 | Parbhani | 1931 | 7 | 3 | 10 | 14 | 6 | 20 |
| 21 | Hingoli | 984 | 7 | 3 | 10 | 7 | 3 | 10 |
| 22 | Beed | 2856 | 7 | 3 | 10 | 20 | 9 | 29 |
| 23 | Nanded | 2027 | 7 | 3 | 10 | 14 | 6 | 20 |
| 24 | Latur | 1908 | 7 | 3 | 10 | 13 | 6 | 19 |
| 25 | Osmanabad | 1365 | 7 | 3 | 10 | 10 | 4 | 14 |
| 26 | Amaravati | 2898 | 7 | 3 | 10 | 20 | 9 | 29 |
| 27 | Akola | 1788 | 7 | 3 | 10 | 13 | 5 | 18 |
| 28 | Washim | 2183 | 7 | 3 | 10 | 15 | 7 | 22 |
| 29 | Yavatmal | 4697 | 7 | 3 | 10 | 33 | 14 | 47 |
| 30 | Buldhana | 3788 | 7 | 3 | 10 | 27 | 11 | 38 |
| 31 | Nagpur(Rural) | 1437 | 7 | 3 | 10 | 10 | 4 | 14 |
| 32 | Nagpur(City) | 5509 | 7 | 3 | 10 | 39 | 17 | 56 |
| 33 | Wardha | 2378 | 7 | 3 | 10 | 17 | 7 | 24 |
| 34 | Bhandara | 1133 | 7 | 3 | 10 | 8 | 3 | 11 |
| 35 | Gondia | 1524 | 7 | 3 | 10 | 11 | 5 | 16 |
| 36 | Chandrapur | 1347 | 2 | 8 | 10 | 3 | 11 | 14 |
| 37 | Gadchiroli | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | Total | 78425 | | | | 489 | 300 | 789 |

**Government Of Maharashtra**

No.Annayo-2015/C.R.125/CS-22
Food Civil Supplies and Consumer Protection Department,
Mantralaya. Mumbai- 400 032.
Date:- 14.09.2015.

To,

The General Manager (Mah.),
Food Corporation of India,
Dheeraj Arma, 2nd floor,
Behrampada, Bandra (E),
Mumbai-400 051.

**Subject:- Allocation of foodgrains (Rice and Wheat) at BPL Rates for the period of April, 2015 to September, 2015 under Annapurna Schemes of States/UTs.**

**Reference:-** Government of India, Ministry of Rural Development, NSAP Division, letter no. J-11011/1/2015-NSAP (Annapurna) dated 24.08.2015.

Sir,

The Ministry of Rural Development, NSAP Division, Government of India vide its above referred letter dated 24th August, 2015 has sanctioned monthly allocation under Annapurna Scheme for the period from April, 2015 to September, 2015 to this state. The orders for the field officers and the statement showing district wise monthly allocation of foodgrains under this scheme is enclosed herewith. The validity period for depositing of cost and lifting of foodgrains for the period from April, 2015 to September, 2015 will be upto 30.09.2015.

You are requested to issue suitable instructions to the District Managers and release the allocation to respective districts representative, when they approach for the same. The concerned District Authorities are accordingly being instructed in this regard.

Yours Faithfully,

( Hemant Wadikar )
Section Officer to the Govt. of Maharashtra

Copy to: 1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.

C:\Users\vaidehi.raut\Desktop\Vaidehi Raut\Annapurna\C.R.125-20105.docx